OFFICE OF THE DEAN
GOVT.AYURVEDIC & UNANI PHARMACY,VAZIRABAD NANDED
अधिष्ठाता यांचे कार्यालय,
शासकिय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा, नांदेड
दुरध्वनी क्रं.०२४६२-२३४५६७ Email ld-gaupnanded34@gmail.com
GST No. 27AAAGO0745B1ZQ

| जा.क्र.शाआयुरनां/औपप्रशा/केंअ/यंत्रसामुग्री खरेदी/2645 /२०१९ | दि.26/11 /२०१९ |
|---|---|

**कच्ची द्रव्यांचे दरपत्रक**

प्रति,

______________________________

______________________________

विषय - **शासकीय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा, नांदेड**
कच्ची औषधी द्रव्ये खरेदी करणेकरिता सिलबंद दरपत्रके सादर करणेबाबत.

शासकीय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा, नांदेड येथे यासोबत जोडल्या प्रमाणे कच्ची औषधी द्रव्ये खरेदी करावयाची आहे. ती खरेदी करण्यासाठी आपलेकडुन दरपत्रके मागविण्यांत येत आहेत.

त्याकरिता यासोबत जोडलेल्या यादीप्रमाणे दरपत्रके खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन या कार्यालयास सादर करावीत.

| अ.क्र. | बाब | कालावधी |
|---|---|---|
| १ | दरपत्रक सादर करण्याचा कालावधी | दि. २८/११/२०१९ ते ०५/१२/२०१९ (या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत, शासकीय स्थानिक सुट्टीचे दिवस वगळुन सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.३० ) |
| २ | दरपत्रक उघडण्याचा कालावधी दिनांक व वेळ | दि. ०७/१२/२०१९ वेळ दुपारी ०३.०० वाजता |
| ३ | दरपत्रक उघडण्याचे ठिकाण | अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा, वजिराबाद, नांदेड यांचे दालनात. |

**अटी व शर्ती :-**

१) यासोबत आवश्यक असलेली कच्ची औषधी द्रव्यांच्या यादीप्रमाणे उत्तम दर्जाची असावीत.
२) दरपत्रकासोबत कच्ची औषधी द्रव्यांचे नमुने (योग्य अयोग्य ठरविण्यासाठी आवश्यक असेल इतक्या प्रमाणात) सादर करावीत.
३) आदेशानुसार कच्ची औषधी द्रव्यांचा पुरवठा या रसशाळेस झाल्यानंतर, स्थानिक समितीने पसंद केल्यानंतर व औषधी परिक्षण प्रयोगशाळेत तपासणी झाल्यानंतर द्रव्ये स्विकारण्यांत येतील.
४) सदर दरपत्रके रद्द करणे, स्थगित करणे व इतर अनुषंगीक अधिकार अधिष्ठांता यांचेकडे राखून ठेवण्यांत आलेले आहे.
५) प्रत्येक पुरवठादाराने एकच दरपत्रक सादर करावे.
६) नोंदणीकृतसंस्थेच्या लेटर हेडवर दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे.
७) कच्ची औषधी द्रव्यांची किंमत जी.एस.टी.,वाहतूक (रसशाळेत पोहचेपर्यन्तच्या) संपूर्ण खर्चासहित असावी.
८) दरपत्रकात कोणत्याही प्रकारची खाडाखोड आणि ओव्हर रायटींग असता कामा नये.खाडाखोडीचे दरपत्रक स्विकारले जाणार नाही.
९) मुदतीनंतर प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.
१०) दरपत्रकावर"कच्ची औषधी द्रव्ये खरेदी बाबतचे दरपत्रके" असे ठळक अक्षरात लिहिण्यात यावे.
११) दरपत्रकासोबत दुकान नोंदणी पत्राची,जी.एस.टी. नोंदणी पत्राची प्रत व पॅनकार्डची प्रत जोडावीत.

.....२

१२) कच्ची औषधी द्रव्ये उत्तम/ दर्जेदार असावीत,दरपत्रकामध्ये मंजूर करण्यात आलेल्या दराव्यतिरिक्त इतर कोणतेही दर देय होणार नाहीत.

१३) ज्या पुरवठादारांचे एका संविदेखालील मुल्य रुपये २.५० लाख पेक्षा जास्त असल्यास नियमाप्रमाणे देयकाच्या एकूण रक्कमेच्या दोन टक्के प्रमाणे जी.एस.टी.रक्कम कपात करण्यात येईल.

१४) या कार्यालयाचे पुरवठा बाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आंत कच्ची औषधी द्रव्यांचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

१५) सदरील दरपत्रके ही अधिष्ठाता,शासकीय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा,वजिराबाद,नांदेड- ४३१६०१ जिल्हा नांदेड (महाराष्ट्र) या पत्यावर पाठवावे.

१६) दरपत्रके प्रत्यक्ष किंवा पोस्टाव्दारे नमुद केलेल्या कालावधीत या कार्यालयास पोहचतील याची सर्व जबाबदारी आपली स्वतःवी राहील.दरपत्रके ई-मेलवर किंवा व्हॉटस्पवर स्विकारले जाणार नाहीत.

१७) खरेदी प्राधिका-याबरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छूक संस्थेने एकल दरपत्रक देण्याबाबत निविदाकारांचे हमी पत्र देणे आवश्यक राहील.

सोबत :- (०१)

(डॉ. वाय.आर.पाटील)
अधिष्ठाता
शासकीय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा,
नांदेड.

**शासकीय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा,नांदेड**
**दरपत्रके मागविण्यात येणाऱ्या कच्ची औषधी द्रव्यांची यादी**

| अ.क्र. | कच्ची औषधी द्रव्यांची नांव | पुरवठा करावयाचे उपयुक्त अंग व वैशिष्ठये | परिमाण किलो ग्रॅम मध्ये |
|---|---|---|---|
| १ | मामेजवा<br>(Enicostemma Littorale) | पंचाग, शुष्क, स्वच्छ | ३०० किलो. |
| | | | |

(डॉ. वाय.आर.पाटील)
अधिष्ठाता
शासकीय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा,
नांदेड.